वर्ष : ०४ | अंक: २६ | मुंबई, मंगळवार २२ मे २०१८ ते २८ मे २०१८ | पृष्ठ: ४

# पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. THW/205/2016-2018

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 पोलिसांना मोफत लोकल प्रवास

3 → महिला सक्षमीकरणाच्या बाता

मंगळावर पाठविणार स्वचलित हेलिकॉप्टर ← 4

### पालघर पोटनिवडणूक

## उद्धव ठाकरे-योगी आमने-सामने




**पालघर लोकसभा पोटनिवडणुकीत शिवसेना आणि भाजपचा वाद टोकाला जाणार हे जवळपास निश्चित आहे. या पोटनिवडणुकीच्या प्रचारासाठी स्वत: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मैदानात उतरले आहेतच, शिवाय आता उत्तर भारतीय मतांना आकर्षित करण्यासाठी थेट उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदिनाथ यांना भाजपने पाचारण केले आहे.**

महत्त्वाचे म्हणजे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ हे एकाच दिवशी म्हणजे २३ मे रोजी आमने सामने येणार आहेत. उद्धव ठाकरे आणि योगी आदित्यनाथ यांची बुधवारी २३ मे रोजी नालासोपाऱ्यात जाहीर सभा होणार आहे.

नालासोपाऱ्यात मोठ्या प्रमाणात उत्तर भारतीय मतदार आहेत. मतदारांना आवाहन करण्यासाठी भाजपने उत्तर प्रदेशचे योगी आदित्यनाथ यांना पाचारण केले आहे. नुकतीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही नालासोपाऱ्यात सभा घेत, शिवसेनेसह स्थानिक बहुजन विकास आघाडीचे आमदार हितेंद्र ठाकूर यांच्यावर टीका केली होती. या सभेसाठीही भाजपचे उत्तर प्रदेशचे खासदार आणि अभिनेते मनोज तिवारी यांची उपस्थिती होती. इलाका तो कुत्तों का होता है, शेर का नाही, असा टोला प्रचारसभेत भाषण करताना मुख्यमंत्र्यांनी ठाकूरांना हाणला होता. दरम्यान, कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून, २३ मे रोजी पोलिसांच्या अधिक तुकड्या तैनात करण्यात येणार आहेत. पालघर पोटनिवडणुकीच्या प्रचारात उद्धव ठाकरेंनीही उडी घेतली आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंच्या पालघरमध्ये दोन जाहीर सभा होणार आहेत. नालासोपाऱ्याला २३ मे रोजी तर तर दुसरी सभा बोईसरला २५ मे रोजी होणार आहे.

## मुंबई-गोवा जलवाहतूक आठ दिवसांत सुरु

*मुंबई - मुंबईहून कोकणात जाणाऱ्या प्रवाशांचा प्रवास सुखकर, जलद आणि स्वस्त होणार असल्याची शक्यता आहे. मुंबई-गोवा जलमार्गाचे काम अंतिम टप्प्यात असून येत्या आठ दिवसांत जलवाहतूक सुरू होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.*



सरकारने मुंबई-गोवा जलवाहतुकीस १ डिसेंबर २०१६ रोजी परवानगी दिली आहे. त्यानंतर गेल्या कित्येक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर मुंबई-गोवा मार्गावरून वाहतूक सेवेचा धूमधडाक्यात प्रारंभ करण्याची तयारी सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली. या जलवाहतुकीचा मुंबई ते गोवा संभाव्य तिकीट दर ९०० रुपये असेल असे समजते. केंद्र सरकारतर्फे देशात जलवाहतुकीचे जाळे विस्तारण्यासाठीचे प्रयत्न सुरू आहेत. रस्ते व रेल्वे मार्गांच्या तुलनेत जलवाहतूक पर्यावरणपूरक आहे. त्यामुळेच केंद्र सरकारने 'सागरमाला' प्रकल्पाची घोषणा केली. याअंतर्गत मुंबई-गोवा मार्गावरील जेट्टींचे काम पूर्ण केले जात आहे. मुंबई-गोवा जलमार्ग हा केंद्रासह राज्य सरकारचा महत्त्वपूर्ण प्रकल्प मानला जातो.

**महत्त्वाचे थांबे**

- **मुंबईत भाऊचा धक्का**
- **दिघी**
- **दाभोळ**
- **रत्नागिरी**
- **विजयदुर्ग**
- **देवगड,**
- **पणजी**

**प्रवास होणार सुखकर**

- कोकण पर्यटनाला चालना
- मालवाहतुकीला वेग
- मुंबई-गोवा महामार्गावरील ताण कमी होणार

**किल्लेदर्शन घडणार**

गेट वे ऑफ इंडिया, जंजिरा, रेवदंडा, जयगड, पूर्णगड, विजयदुर्ग, मालवण, गोपाळगड यांसारख्या सागरी किल्ल्यांची भ्रमंती पर्यटकांना करता येणार आहे.

## गाडी चालवताना मोबाईलवर बोलणे गुन्हा नाही



**कोच्ची** - गाडी चालवताना मोबाईलवर बोलताना आढळल्यास पोलिसांकडून चालकावर दंडात्मक कारवाई केली जाते. खरं तर मोटार वाहन अधिनियमात मोबाईल फोनच्या वापराबाबत कुठलाही उल्लेख करण्यात आलेला नाही. त्यामुळे वाहन चालवताना मोबाईलवर बोलणे गुन्हा ठरत नाही, असे केरळ उच्च न्यायालयाने स्पष्ट केले.

कोची येथील नागरिक संतोष एम. जे. यांच्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने हा निर्णय दिला आहे. गेल्या वर्षी संतोष हे गाडी चालवत असताना मोबाईलवर बोलत होते. त्यावेळी त्यांना वाहतूक पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांच्या खटल्यावर निर्णय देताना उच्च न्यायालयाच्या एकेरीपीठाने गाडी चालवताना मोबाईलवर बोलताना कुणी आढळले तर मोटार वाहन अधिनियमाच्या कलम ११८ (ई) अंतर्गत तो दंडनीय अपराध असल्याचे म्हटले होते. या निर्णयानंतर हे प्रकरण केरळ उच्च न्यायालयाच्या खंडपीठासमोर आले. उच्च न्यायालयाचे ए. एम. शफीक आणि पी. सोमरंजन यांच्या खंडपीठाने यावरील सुनावणीत सांगितले की जोपर्यंत ड्रायव्हिंगमुळे लोकांची सुरक्षितता धोक्यात येत नाही, तोपर्यंत त्याला बेकायदेशीर म्हणता येणार नाही.

**कांदवळवनाची कत्तल केल्याचा चौथा गुन्हा दाखल झाल्याने तिळपापड**

## भाजपचे आमदार नरेंदर मेहतांचा कार्यकर्त्यांसह पोलिस ठाण्यात धिंगाणा

### सहा तास झुंडशाही करत गुन्हा मागे घेण्यासाठी टाकला दबाव



**भाईंदर** - कांदळवनांची कत्तल करून बांधलेल्या सेव्हन इलेव्हन क्लब प्रकरणात आणखीन एक गुन्हा दाखल झाल्याने भाजप आमदार नरेंद्र मेहता यांचा चांगलाच तिळपापड झाला आहे. गुरुवारी मीरा रोड पोलिस ठाण्यात महापौर डिंपल मेहता व कार्यकर्त्यांसह जाऊन जोरदार धिंगाणा घालत पोलिसांवर दबाव टाकला. सायंकाळी ७ ते रात्रौ १ वाजेपर्यंत ही झुंडाशाही सुरू होती. मात्र अधिकाऱ्यांनी सत्तेची ही मस्ती झुगारल्याने हिरवे-पिवळे झालेल्या मेहतांना अखेर चिडीचूप घरी परतावे लागले.

कांदळवन नष्ट करून मीरा रोड येथे बनविण्यात आलेल्या सेव्हन-इलेव्हन क्लब प्रकरणात भाजप आमदार नरेंद्र मेहता यांचा पाय अधिकच खोलात जाऊ लागला आहे. मेहता यांचा सख्खा भाऊ व महापौर डिंपल मेहता यांचे पती विनोद याच्यावर महसूल विभागाने यापूर्वी कांदळवन नष्ट केल्याचा ठपका ठेवत तीन तर मेव्हणा राज सिंह याच्यावर एक गुन्हा दाखल केला होता. त्यातच १२ मे रोजी आमदार नरेंद्र मेहता यांनी मोठा गाजावाजा करून या क्लबचे उद्घाटन करून मेंबरशिप गोळा केली, पण या सोहळ्याचा आनंद मावळत नाही तोच मंडल अधिकारी लक्ष्मण पवार यांनी विनोद मेहता यांच्यावर चौथा गुन्हा दाखल केला. यामुळे नरेंद्र मेहता यांचा चांगलाच तिळपापड झाला आहे. त्यांनी महापौर डिंपल मेहता व कार्यकर्त्यांसह पोलीस ठाण्यात धाव घेऊन ठिय्या दिला.

## डिझेल आणि टोलमुळे 'स्कूल बस'ची फी वाढ

**मुंबई (सम्यक कासारे)**- इंधनाच्या वाढत्या दराचा फटका स्कूल बसला बसण्याची शक्यता आहे. कारण डिझेल आणि टोलमुळे 'स्कूल बस'च्या फीमध्ये वाढ होण्याचा अंदाज आहे. स्कूल बस ओनर्स असोसिएशनकडून याबाबतचे संकेत देण्यात आले आहेत.





डिझेलचे वाढते दर यांच्यासोबतच ठिकठिकाणी भरावे लागणारे टोल हे स्कूल बसच्या शुल्कवाढीस कारणीभूत ठरण्याची शक्यता आहे. राज्य सरकारने चार टोलनाक्यांवर स्कूल बसला सवलत दिली नाही, तर या परिसरातील सध्याच्या स्कूल बस शुल्कात प्रति विद्यार्थी ५०० ते ६०० रुपये वाढ करण्याचा इशारा असोसिएशनने दिला आहे.स्कूल बस ओनर्स असोसिएशनची विशेष बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत भाडेवाढीच्या प्रस्तावावर चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे.

## यूपीएससीचे नियम बदलणार?


**नवी दिल्ली** - मोदी सरकारकडून देशभरात होणाऱ्या लोकसेवा परीक्षांच्या नियमांमध्ये अमूलाग्र बदल केला जाण्याची शक्यता आहे. या अंतर्गत नोकरी आणि केडर निवडण्यासाठी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचं पुस्तकी ज्ञानासह व्यवहारिक ज्ञानही तपासलं जाणार आहे. परीक्षेच्या निकालानंतर होणाऱ्या प्रशिक्षणाच्या आधारवर ते कोणत्या सेवेत जाण्यासाठी पात्र आहे, हे ठरवंल जाईल.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सल्ल्यानंतर हे नवे बदल याच वर्षी लागू होतील, असं म्हटलं जात आहे. या नव्या सिस्टमनुसार अशी शक्यताही आहे की, ट्रेनिंगमधील सुमार कामगिरीमुळे परीक्षेतील टॉपरला आयएएस केडर मिळू शकणार नाही, तर त्याच्यापेक्षा कमी रँक असलेल्या उमेदवाराने ट्रेनिंगमध्ये चांगली कामगिरी केली तर तो आयएएस बनू शकतो.पंतप्रधान कार्यालयाच्या निर्देशानुसार, कर्मचारी प्रशिक्षण विभागाने ही नवी यंत्रणा लागू करण्यासंदर्भात अनेकांकडून सल्ले मागितले आहेत. या प्रस्तावानुसार, उत्तीर्ण उमेदवारांना फाऊंडेशन कोर्स पूर्ण केल्यानंतर आणि त्यात मिळालेल्या गुणांवरच केडर आणि नोकरीचं ठिकाण दिलं जाईल. जर नवे नियम लागू झाले तर ट्रेनिंगनंतरच कोणाला कोणती सेवा आणि कोणत्या राज्याचं केडर मिळणार हे ठरणार आहे. ट्रेनिंगमध्ये मिळालेले गुण यूपीएससीच्या अंतिम निकालात जमा होतील, त्यानंतर त्यांचा रँक ठरणार आहे.




## सौजन्य व्हॉट्सअप



# पोलिसांना मोफत लोकल प्रवास



**मुंबई - मुंबई पोलिस दलातील कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांना लवकरच लोकलमधून मोफत प्रवास करता येणार आहे. त्यासाठी या महिनाअखेरपर्यंत मुंबई पोलिस आणि रेल्वे सुरक्षा दलादरम्यान सामंजस्य करार होणार आहे. हा करार एक वर्षासाठी असेल, अशी माहिती सूत्रांनी दिली.**

पश्चिम रेल्वेवरील एल्फिन्स्टन रोड स्थानकात काही दिवसांपूर्वी झालेल्या दुर्घटनेनंतर मुंबई पोलिस आयुक्त आणि रेल्वे मंत्री पियुष गोयल यांच्यादरम्यान कर्तव्यावर असलेल्या मुंबई पोलिसांना लोकलमधून मोफत प्रवासाची मुभा देण्यात यावी, या विषयावर चर्चा झाली होती. लोकल प्रवाशांना सुरक्षित प्रवास करता यावा, या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे. आपत्कालीन स्थितीत प्रवाशांना या पोलिसांची मदत होईल, हा त्यामागील विचार आहे. लोकल प्रवास करतेवेळी हे पोलिस गणवेशात असणे गरजेचे असेल. त्यांना कोणत्या डब्यांतून प्रवास करण्याची मुभा असेल, हे अद्याप निश्चित झाले नाही. सध्या रात्री ९ ते सकाळी ६ वाजेपर्यंत मध्य व पश्चिम रेल्वेच्या महिला डब्यांमध्ये लोहमार्ग पोलिस तैनात असतात.

# सेनेने भाजपशी बेईमानी केली -फडणवीस

**मुंबई-** आमदार कृष्णा घोडा यांच्या निधानमुळे रिक्त झालेल्या पालघर विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत भाजपने शिवसेनेच्या उमेदवाराला मित्रपक्ष म्हणून खुल्या मनाने पाठिंबा देऊन सेनेसाठी मते मागितली. मात्र, भाजपचे खासदार चिंतामण वनगा यांचे निधन झाल्यानंतर शिवसेनेने कट-कारस्थान करून भाजपशी बेईमानी केली, असा आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. पालघर लोकसभा मतदारसंघातील भाजपचे उमेदवार राजेंद्र गावित यांच्या प्रचारासाठी डहाणू व नालासोपारा येथे झालेल्या प्रचारसभांमध्ये ते बोलत होते. मुख्यमंत्री म्हणाले, ही पोटनिवडणूक भाजप जिंकली तरच ती वनगांना श्रद्धांजली ठरेल. चिंतामण वनगा यांनी संघर्षमय जीवन जगताना आदिवासींसाठी लढून राजकारणात एक एक पद मिळवले. ते भाजपकडून ९ वेळा निवडणुका लढले. काही निवडणुका हारले, तरीही त्यांची पक्षनिष्ठा कायम होती. राजकारणात वनगांनी कम्युनिष्ट, काँग्रेस, शिवसेनेशी संघर्ष केला. त्यांच्या निधनानंतर पालघर लोकसभा पोटनिवडणुकीसाठी आपण विविध



पक्षांशी बोलून पालघर लोकसभेसाठी वनगा परिवारात तिकीट देण्याचे कबूल केले होते. यापूर्वी कृष्णा घोडा यांच्या निधनानंतर झालेल्या पालघर विधानसभा पोटनिवडणुकीसाठी मित्रपक्ष असलेल्या शिवसेनेसाठी खुल्या दिलाने पाठिंबा दिला. मात्र, शिवसेनेने भाजपशी गद्दारी केली, असा आरोप मुख्यमंत्र्यांनी केला. जे वनगा तिकिटासाठी मातोश्रीवर गेले आहेत, ते पडल्यानंतर त्यांना शिवसेनेचे दार कायमचे बंद होईल.

## पावसाळ्यात लांब पल्ल्याच्या ३१ गाड्या रद्द?

**मुंबई** - पावसाळ्यात लांब पल्ल्याच्या ३१ गाड्या रद्द करण्याचा प्रस्ताव मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाने रेल्वे मंडळाकडे पाठवला आहे. सर्व बाबींवर चर्चा करून रेल्वे मंडळ याबाबत निर्णय घेणार असल्याचे सूत्रांनी सांगितले. धुक्यामुळे वाहतूक विस्कळित होत असल्याच्या पार्श्वभूमीवर मध्य रेल्वेने हिवाळ्यात लांब पल्ल्याच्या गाड्यांच्या वेळापत्रकात बदल केले होते. त्याच धर्तीवर हा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. प्रवाशांचा कमी प्रतिसाद असलेल्या गाड्या किंवा प्रवाशांना पर्यायी गाड्या उपलब्ध असणाऱ्या मार्गांवरील पावसाळ्यात रद्द ठेवण्याचा मध्य रेल्वेचा विचार आहे. मुंबई-पुणे दरम्यान रोज सात गाड्या धावत असतील; तर त्यापैकी दोन गाड्या रद्द करण्यात येतील, अशी माहिती मध्य रेल्वेच्या एका अधिकाऱ्याने दिली. आम्ही रेल्वे बोर्डाच्या निर्णयाची वाट पाहत आहोत. त्यामुळे नेमक्या कोणत्या गाड्या रद्द होतील, हे जाहीर केलेले नाही, असेही या अधिकाऱ्याने सांगितले.

## शिक्षण विभागालाच मराठीचे वावडे

**मुंबई** - महाराष्ट्र शासनाने नुकत्याच काढलेल्या मराठी सक्तीबाबतच्या परिपत्रकाची सध्या जोरदार चर्चा असली तरी वारंवार शासन अधिकाऱ्यांकडून आणि शासनाच्या वेगवेगळ्या विभागांकडून या आदेशाकडे दुर्लक्ष होत असल्याचे उघड होत आहे. राज्यातील अकृषी विद्यापीठांना राष्ट्रीय क्रमवारीमध्ये वरचे स्थान मिळण्यासाठी गठित केलेल्या सुकाणू समितीची कर्तव्ये निश्चित करण्याबाबत शासनाने नुकताच शासन निर्णय जारी केला आहे. मात्र उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा हा शासन निर्णय पूर्णपणे इंग्रजी भाषेतला आहे. त्यामुळे शिक्षण विभागालाच मराठीचे वावडे असल्याचे चित्र आहे. राज्य सरकारने शासकीय स्तरावर मराठी भाषेचा वापर करण्यासंदर्भात नुकताच शासन निर्णय जारी केला. शिक्षणमंत्री विनोद तावडे हे मराठी भाषा विभाग व उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे मंत्री आहेत. ज्या मराठी भाषा विभागाने हा शासन निर्णय जारी केला त्याच मंत्र्यांच्या अखत्यारीतील दुसऱ्या विभागाचा हा इंग्रजीतील शासन निर्णय असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. शिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्या एका विभागाने काढलेल्या निर्णयाची शाई वाळायच्या आतच दुसऱ्या विभागाने त्याला छेद दिला. केंद्राचे परिपत्रक असते तर गोष्ट वेगळी होती. मात्र, राज्य सरकारचा शासन निर्णय आठवडा होत नाही तोपर्यंत इंग्रजीत येतो, यावरून शिक्षणमंत्री मराठीबाबत किती जागरूक आहेत याची प्रचिती येते.

# सरकारची बंपर नोकरभरती, ३६,००० युवकांना मिळणार रोजगार

**मुंबई-** राज्यातील विविध विभागातील गेल्या अनेक वर्षापासून रिक्त असलेली पदे भरण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला. तब्बल ३६ हजार पदे भरण्यास मंजुरी देण्यात आली असून प्रामुख्याने कृषी व ग्रामविकास विभागातील पदे भरली जाणार आहेत. या निर्णयामुळे युवकांना रोजगाराच्या जास्तीत जास्त संधी उपलब्ध होणार आहेत. शासनाच्या विविध विभागातील ७२ हजार पदे भरण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात केली होती. त्यातील ३६ हजार पदे यंदा पहिल्या टप्प्यात भरण्यास त्यांनी मान्यता दिली. उर्वरित ३६ हजार पदे ही पुढील वर्षी भरण्यात येणार आहेत. वेतन, सेवानिवृत्तीवरील वार्षिक खर्च ६७ हजार कोटी कर्मचारी-अधिकाऱ्यांच्या वेतनावर राज्य सरकार दरवर्षी साधारणत: ४८ हजार कोटी रुपये खर्च करते. या शिवाय, निवृत्ती वेतनावर १९ हजार कोटी रुपये खर्च केले जातात. सातवा वेतन आयोग लागू केला तर राज्याच्या तिजोरीवर वार्षिक १५ हजार कोटी रुपयांचा बोजा पडणार आहे.



**१.८० लाख पदे रिक्त**

राज्यात कर्मचारी व अधिका-यांची तब्बल १ लाख ८० हजार पदे रिक्त आहेत. त्यापैकी केवळ ३६ हजार पदे भरणे म्हणजे पदभरतीचा अनुशेष वाढविणेच आहे, अशी टीका राजपत्रित अधिकारी महासंघाने केली आहे. ५०,०००कर्मचारी दरवर्षी सेवानिवृत्त होतात. अशावेळी ३६ हजार पदे भरणे हे पुरेसे नाही. उलट त्यामुळे १४ हजार रिक्त पदांची भरच पडणार आहे. ३६ हजार नव्हे तर १ लाख ३६ हजार पदे भरण्याचा निर्णय मुख्यमंत्र्यांनी घ्यावयास हवा होता, असे महासंघाचे नेते ग.दि.कुलथे यांनी म्हटले आहे.

# दादर मंडईला अनधिकृत फेरीवाल्यांचा विळखा

**मुंबई - मुंबईच्या दादरमधली क्रांतीसिंह नाना पाटील मंडई, मुंबईतलं हे सर्वात मोठं भाजी मार्केट रेल्वेस्थानकापासून जवळ असल्यानं ठाणे,बदलापूर,पालघर, विरारमधून अनेक छोटे व्यापारी इथे दररोज भाजीपाला विकत घ्यायला येतात. मात्र अनधिकृत फेरीवाल्यांच्या विळख्यात अडकल्याने या मंडईतील विक्रेत्यांना याचा मोठा फटका बसतोय. त्यामुळे मंडईचा जीव गुदमरतोय आणि ग्राहकांची सुध्दा गैरसोय होतेय. रेल्वेस्थानकापासून १५० मीटरच्या अंतरात फेरीवाल्यांना बसण्यास मनाई करण्याचे आदेश कोर्टाने दिले असले तरी या आदेशाला न जुमानता पहाटे ५ ते सकाळी ८ पर्यंत अनधिकृत फेरीवाल्यांनी दादर स्टेशच्या परिसराला विळखा घातलाय.**

महापालिकेचे अधिकारी आणि पोलिस प्रशासनाकडून याविरोधात कोणतीही कारवाई होत नसल्याने मंडईतील व्यापाऱ्यांना याचा मोठा फटका बसलाय. दादर स्टेशन पश्चिमेला अगदी लागून असलेल्या कवी केशवसूत उड्डाणपूलाखाली हे व्यापारी पहाटे ५ पासून आपलं बस्तान बसवतात. महापालिकेची गाडी येईपर्यंत या फेरीवाल्यांना हटवण्यासाठी पालिकेचे कोणतेही अधिकारी या वेळात उपलब्ध नसतात. हे अनधिकृत फेरीवाले या तीन तासांत या भागात प्रचंड कचरा करतात. तसेच भाज्यांनी भरलेले टेम्पो अनधिकृतरित्या केशवसुत उड्डाणपुलावर सर्रासपणे उभे असतात त्यामुळे सकाळच्या वेळेत इथे वाहतूकीचीही समस्या निर्माण होते. पालिकेच्या जी नॉर्थ विभागाचे कर्मचारी दोन शिफ्टमध्ये काम करतात. सकाळी ८ ते ३ आणि दुपारी ३ ते रात्री ११ या काळात पालिकेचे कर्मचारी या भागात कार्यरत असतात. मात्र पहाटे ५ ते ८ या



वेळेत कोणतीही कारवाई होत नसल्याने याचाच फायदा घेऊन या अनधिकृत फेरीवाल्यांनी सध्या या भागात आपलं चांगलंच बस्तान बसवलंय. क्रांतीसिंह नाना पाटील मंडईतील व्यापारांना याचा मोठा फटका सहन करावा लागतोय. हे व्यापारी कर भरतात, वीजबील भरतात, आपल्या गाळ्यातील नोकरांचा पगार त्यांना द्यावा लागतो. हे सर्व करून या अनधिकृत फेरीवाल्यांमुळे त्यांचा धंद्यावर गदा आलीय. कोर्टाची ऑर्डर असतानाही पालिका आणि पोलिस मूग गिळून का बसलेत. ते कारवाई का करत नाहीत? हयाचं मुख्य कारण म्हणजे त्यांना या बदल्यात अनधिकृत फेरीवाल्यांकडून मिळणारा मलिदाच आहे असा आरोप भाजीव्यापारी शंकरराव पाटील यांनी लोकमतशी बोलताना केला. अनधिकृत व्यापारी आणि प्रशासन यांच्या एकत्रित संगनमतामुळेच मंडईतील व्यापाऱ्यांना आर्थिक फटका सहन करावा लागतोय अशी टीका त्यांनी केली. एलफिस्टन दुर्घटनेनंतर मनसेनं अनधिकृत फेरीवाल्यांविरोधात आंदोलनाचं हत्यार उपसल्यानंतर पालिकेने कारवाईचे सोपस्कार पूर्ण केले मात्र गेल्या कित्येक वर्षांपासून अनधिकृतरित्या बसणाऱ्या या फेरीवाल्यांकडे कानाडोळा का करण्यात येतोय? यात काही काळंबेरं तर नाही ना? अशी शंका मंडईतील व्यापाऱ्यांनी उपस्थित केलीय. चौकट आम्ही नियमानुसार फेरीवाल्यांवर कारवाई करत असतो. शिवाजी पार्क पोलिस स्टेशनची गाडी सकाळी ७ वाजल्यापासून या भागात कार्यरत असते. पालिकेच्या कर्माचाऱ्यांनी केलेल्या कारवाईला संरक्षण देणं हे आमचं पहिलं काम आहे. त्याप्रमाणे आम्ही कार्यरत असतो. मात्र सकाळी ३ तासात बसणाऱ्या अनधिकृत फेरीवाल्यांना हटवण्यासाठी पालिकेनेही आपलं बळ वाढवायला हवं गंगाधर सोनावणे - वरिष्ठ पोलिस निरीक्षक, शिवाजी पार्क पोलिस स्टेशन आमचे कर्मचारी दिवसभर दोन शिफ्टमध्ये काम करतात. सकाळी ७ वाजल्यापासून आमची गाडी या भागात फिरत असते. भल्या पहाटे येऊन इथे फेरीवाले बसतात मात्र आमची गाडी आली की आमचे कर्मचारी त्यांना या भागातून हटवतात. मात्र वरिष्ठांकडे मी या भागात अतिरिक्त कर्मचारी वर्ग वाढवण्यासाठी प्रयत्न करतोय. जेणेकरून या अनधिकृत फेरीवाल्यांवर निर्बंध बसेल.

# सरकारी रुग्णालयांतून दीड वर्षांपासून मधुमेह-उच्च रक्तदाबाची औषधे बेपत्ता

**मुंबई** - मधुमेह आणि उच्च रक्तदाबाचे रुग्ण वेगाने वाढत असून या आजारांमुळे हृदयविकारासह इतर अनेकआजारांनी जवळपास ४५ टक्के रुग्णांचा मृत्यू होतो. यामुळे केंद्र सरकारनेही असंसर्गजन्य अशा मधुमेह व उच्च रक्तदाबाला राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमात प्राधान्य दिले असताना आरोग्य विभागाच्या राज्यातील रुग्णालयांसाठी गेल्या दीड वर्षांपासून मधुमेह व उच्च रक्तदाबाच्या औषधांची खरेदीच झाली नसल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे.

परिणामी जिल्हा रुग्णालये तसेच ग्रामीण रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना स्थानिक पातळीवर अथवा बाहेरून औषध खरेदी करण्यास सांगितले जात आहे. राज्यातील बहुतेक जिल्हा रुग्णालयांत औषधांची एकूणच बोंब असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही याबाबत आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. प्रदीप व्यास यांच्याकडे विचारणा केली. आरोग्यमंत्री दीपक सावंत हेदेखील याबाबत कोणतीही भूमिका घेत नाहीत. असंसर्गजन्य आजारामुळे जवळपास ४५ टक्के रुग्णांचा मृत्यू होत असल्याचे आरोग्य विभागाच्याच अहवालात नमूद केले असून भारतात मधुमेहाचे



६.२ टक्के तर उच्च रक्तदाबाचे १५.९ टक्के रुग्ण आहेत. गेल्या वर्षी आरोग्य विभागाअंतर्गत जिल्हा रुग्णालये तसेच ग्रामीण रुग्णालयात एक कोटीहून अधिक मधुमेहाच्या रुग्णांनी उपचारासाठी हजेरी लावली. तसेच उच्च रक्तदाबाचा त्रास होत असलेले एक कोटी ३७ लाख लोक बाह्यरुग्ण विभागात उपचारासाठी आल्याचे आरोग्य विभागाच्या एका ज्येष्ठ डॉक्टरांनी सांगितले. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य खरेदीतील कथित औषध खरेदी घोटाळ्यानंतर गेल्या दीड वर्षांपासून आरोग्य विभागाअंतर्गत केंद्रीय औषध खरेदी समितीची एकही बैठक न झाल्यामुळे विभागाच्या एकूणच औषध खरेदीचे काम ठप्प झाले होते. अत्यावश्यक औषधे स्थानिक पातळीवर खरेदी करण्याच्या सूचना देण्यात आल्यामुळे तशी खरेदी करण्यात येत होती. तथापि यात मधुमेह व उच्च रक्तदाबाच्या औषध खरेदीचा समावेश नसल्यामुळे काही जिल्ह्यांमध्ये रुग्णालयात थोड्याफार प्रमाणात औषधांची खरेदी केली जात होती तर बहुतेक रुग्णालयांत रुग्णांना बाहेरून औषधे घेण्यास डॉक्टरांकडून सागंण्यात येत होते. गेल्या दीड वर्षांसून मधुमेह व उच्च रक्तदाबाच्या औषधांची आरोग्य संचालनालय स्तरावर खरेदी झाली नसल्याचे आरोग्य संचालक डॉ. संजीव कांबळे यांनी मान्य केले.

# इंग्रजी सिनेमा पाहून रचला लुटीचा डाव

**मुंबई** - गुन्ह्यांवर आधारित इंग्रजी सिनेमा पाहून हॉटेलमध्ये काम करणाऱ्या नोकराने मित्राच्या मदतीने चक्क पतसंस्था लुटण्याचा डाव रचला. मात्र, प्रयत्न फसला आणि तो पोलिसांच्या जाळ्यात अडकल्याची घटना घाटकोपरमध्ये घडली. सोहनकुमार दानसिंग, मनीषकुमार राजबहादूर मौर्या अशी अटक आरोपींची नावे आहेत. दोघेही एका हॉटेलमध्ये नोकरीला आहे. यापैकी गेल्या आठवड्यातच सोहनने गुन्ह्यांवर आधारित इंग्रजी सिनेमा पाहिला. याच सिनेमातील बँक लुटीच्या दृश्याने त्याच्या मनावर इतका परिणाम झाला की, त्यानेही बँकेवर दरोडा टाकण्याचे ठरविले. सुरुवातीला आईचे खाते असलेली घाटकोपर पश्चिमेकडील मनशांती नागरी सहकारी पतसंस्था त्याने निवडली. आठवडाभरात पतसंस्थेतील कामकाजाची माहिती घेतली. आणखी दोन ते तीन बँकांमध्ये रेकीही केली. यापैकी आईचे खाते असलेली पतसंस्थाच सर्वदृष्ट्या सोईस्कर ठरणार असल्याने त्याने त्याकडे लक्ष केंद्रित केले. यासाठी हॉटेलमध्ये काम करणाऱ्या मित्र मनीषची मदत घेतली. झटपट श्रीमंत होण्याच्या आमिषाला बळी पडून मनीषही त्यात सहभाग घेतला.

नेहमीप्रमाणे सोमवारी रात्री १०च्या सुमारास पतसंस्थेतील रोखपाल दिवसभरात गोळा झालेल्या रकमेची मोजदाद करीत होतो. त्याचदरम्यान दोघेही हत्यारांसह पतसंस्थेत घुसले. त्यांनी चाकूच्या धाकाने



रोखपालांना धमकावले. या झटापटीत रोखपाल जखमी झाले. त्यामुळे पकडले जाण्याच्या भीतीने हाती आलेली रक्कम घेऊन त्यांनी पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, पतसंस्थेतील कर्मचाऱ्यानी आरडाओरड करीत या लुटारूंचा पाठलाग सुरू केला. याच दरम्यान गस्तीवर असलेल्या पोलिसांच्या मदतीने या लुटारूनां पकडण्यात आले. त्यांच्या चौकशीत वरील घटनाक्रम उघडकीस आला. या प्रकरणी दोघांकडे कसून चौकशी सुरू असल्याची माहिती घाटकोपर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक व्यंकट पाटील यांनी दिली.

# महाराष्ट्र देशातील दुसरे स्वच्छ राज्य ; मुंबईस सर्वात स्वच्छ राजधानीचा मान

**मुंबई - देशातील स्वच्छ राजधानीचा मान मुंबईस मिळाला असून घनकचरा व्यवस्थापनातील सर्वोत्कृष्ट महापालिकेचा पुरस्कार नवी मुंबई महापालिकेस जाहीर झाला आहे. केंद्र शासनाच्या स्वच्छ सर्वेक्षण मोहिमेचा निकाल जाहीर करण्यात आला असून त्यात देशातील दुसरे सर्वोत्कृष्ट राज्यासह विविध विभागांत १० शहरे स्वच्छ ठरली असून यातील ६ शहरांना राष्ट्रीय स्तरावरील स्वच्छता पुरस्कार जाहीर झाला आहे.**

केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत शहरी भागातील स्वच्छतेचे मूल्यांकन करण्यासाठी स्वच्छ सर्वेक्षण २०१८ या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ४ जानेवारी ते १० मार्च या कालावधीत देशातील चार हजार २०३ शहरांचे सर्वेक्षण करण्यात आले होते. या स्पर्धेत झारखंड राज्याने सर्वोत्कृष्ट राज्याचे पहिले पारितोषिक मिळवले तर महाराष्ट्राला दुसरा क्रमांक मिळाला आहे. तर छत्तीसगडने तिसरा क्रमांक मिळविला आहे. तर देशातील सर्वोत्कृष्ट स्वच्छ शहराचा मान इंदूर शहराने पटकावला आहे.

गृहनिर्माण व नागरी व्यवहार राज्यमंत्री (स्वंतत्र प्रभार) हरदीपसिंग पुरी यांनी नवी दिल्लीत ही घोषणा केली. वेगवेगळ्या नऊ विभागांत राज्यातील शहरांना स्वच्छ शहरांचे सर्वोत्कृष्ट पारितोषिके जाहीर झाली आहेत.

तीन लाख ते १० लाख लोकसंख्येच्या शहरामध्ये सर्वात अधिक गतीने स्वच्छतेकडे वाटचाल करणाऱ्या शहरांमध्ये भिवंडी-निजामपूर शहरास प्रथम क्रमांक मिळाला तर छोट्या शहरामध्ये (एक ते तीन लाख लोकसंख्या) भुसावळ शहराने पारितोषिक पटकावले आहे. पश्चिम क्षेत्रातील एक लाखापेक्षा कमी लोकसंख्येच्या शहरांमधील स्वच्छ शहराचा मान पाचगणीने तर नागरिक प्रतिसाद विभागातील सर्वोत्कृष्ट शहराचा मान अमरावती जिल्ह्यातील शेंदूरजनाघाट शहराने मिळविला आहे. उत्कृष्ट नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचा मान सासवडला मिळाला आहे. वेगवेगळ्या नऊ विभागांत राज्यातील शहरांना स्वच्छ शहरांचे सर्वोत्कृष्ट पारितोषिके जाहीर झाली आहेत.

सर्वात स्वच्छ राजधानीचा मान मुंबई शहरास मिळाला आहे. तर नावीन्यपूर्ण विभागात दहा लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये नागपूरला नावीन्यपूर्ण व उत्कृष्ट कार्यशैलीचा प्रथम क्रमांक मिळाला आहे. नागरिक प्रतिसादात देशातील अव्वल शहराचा मान परभणीस मिळाला आहे.



## संपादकीय...

# महिला सक्षमीकरणाच्या बाता


संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक

सत्ताधाऱ्यांना महिला सक्षमीकरणाची चर्चा नेहमीच आवडते. योजनांचा पाऊस पाडत, आपण या कामात कसे पुढे आहोत, हे सिद्ध करण्यासाठी सरकारची कोण धडपड सुरू असते; पण महाराष्ट्रातील वस्तुस्थिती अधिक भीषण म्हणावी अशी. महिला व बालकांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठी तुटपुंजी तरतूद, परंतु त्या योजनांच्या प्रसिद्धीसाठी तब्बल अठरा कोटी रुपयांच्या निधीची व्यवस्था असे येथील चित्र आहे. त्या तुटपुंज्या तरतुदीतही तीस टक्क्यांची कपात करून या सामाजिक प्रश्नांकडे पाहण्याची दृष्टी काय आहे, तेच सरकारने स्पष्ट केले. केंद्र आणि राज्य सरकारांना महिलांच्या सक्षमीकरणाची प्रचंड आस्था असते. त्यामुळेच दऱ्याखोऱ्यात, डोंगरकपारीत राहणाऱ्या गरीब-कष्टकरी स्त्रियांपासून ते शहरी सुशिक्षित महिलांना प्रगतीच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी स्वतंत्र महिला धोरण तयार करण्यात आले. धर्म, रूढी, परंपरा आणि त्यातून जन्माला आलेल्या आणि हजारो वर्षे पोसल्या गेलेल्या पुरुषप्रधान मानसिकतेने महिलांच्या



प्रगतीच्या वाटा अडविल्या गेल्या. परंतु काळ बदलला. संधी दिली तर कोणत्याही क्षेत्रात महिला मागे राहू शकत नाहीत, हे सिद्ध करणारी काही उदाहरणेही समोर आली. देवदासीसारख्या अनिष्ट प्रथा मोडीत काढून त्यात अडकलेल्या स्त्रियांची सुटका करून त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी राज्य सरकारने कायदाही केला. शिक्षणातील प्रमाण वाढवणे, शाळेतील गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी उपस्थिती भत्ता, सायकली अशा अनेक योजनाही आखण्यात आल्या. या सगळ्या योजना आता आर्थिक तरतुदीतील कपातीमुळे अतिशय अडचणीत आलेल्या आहेत. राज्यात महिला व बालकांच्या कल्याणासाठी स्वतंत्र खाते आहे. त्या खात्याचा एक कॅबिनेट मंत्री, राज्यमंत्री, सचिव अशी मंत्रालयापासून ते जिल्हा, तालुकास्तरापर्यंत यंत्रणा कार्यरत आहे. या खात्यामार्फत महिलांच्या शिक्षणापासून, उद्योग-व्यवसायापर्यंत विविध योजना राबविल्या जातात. मात्र त्यासाठी अर्थसंकल्पीय तरतूद मुळातच कमी केली जाते, असा आजवरचा अनुभव आहे. त्यालाही पुन्हा कात्री लावली जाते. मार्चमध्ये नुकत्याच मंजूर करण्यात आलेल्या राज्याच्या २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात सुमारे तीनशे ते सव्वा तीनशे कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्यात आता तीस टक्के कपात करण्यात आली आहे. म्हणजे आणखी नव्वद ते शंभर कोटी रुपये त्यातून कमी होणार. त्यामुळे महिलांच्या अनेक योजनांची हेळसांडच होणार आहे. महिला व बाल विकास विभागाने शासन आदेश काढून तीस टक्के कपात केल्यानंतर, कोणकोणत्या योजनांना किती निधी मिळणार आहे, याची आकडेवारी जाहीर केली आहे. देवदासी पुनर्वसन योजनेंतर्गत व्यवसायाभिमुख प्रशिक्षण घेणाऱ्या महिलांना विद्यावेतन दिले जाते. त्यासाठी या वर्षीच्या अर्थसंकल्पात मुळातच एक लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्यात तीस टक्केकपात केल्यानंतर उरतात सत्तर हजार रुपये. कसले प्रशिक्षण देणार या महिलांना? अशा अनेक वंचित, दुर्बल वर्गातील महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठी किरकोळ निधीची तरतूद करण्यात आली आहे. विशेष म्हणजे महिला व बालकांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठी तुटपुंजी तरतूद, परंतु त्या योजनांच्या प्रसिद्धीसाठी तब्बल अठरा कोटी रुपयांच्या निधीची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यातून काय साध्य होणार आहे? कागदोपत्री घोडे नाचवण्यापेक्षा अंमलबजावणीसाठी आग्रह धरणे ही आजच्या काळाची खरी गरज आहे. सरकारचे या विषयावरील बेगडी प्रेम पाहता, ते प्रत्यक्षात येण्याची शक्यता नाही.



# लोकशाहीची हत्या झाली का?

सत्तास्थापनेची घाई झाली तरी तो 'घटनाभंग' नव्हे वा लोकशाहीचा खून नव्हे. राहुल गांधी म्हणतात त्याप्रमाणे ही लोकशाहीची हत्या असेल तर आपल्याच आमदारांना कोंडून ठेवून मुक्त मतदान करण्याच्या त्यांच्या स्वातंत्र्यावर बंधन घालणे ही न्याय्य लोकशाही व्यवस्था आहे का? आपल्या आमदारांत राजकीय निष्ठा नाही, अशी कबुली यातून काँग्रेस देत होती. राजकीय निष्ठा नसलेल्या आमदारांबद्दल राज्यपालांना संशय वाटला तर त्यात असंवैधानिक काय आहे?

राजकीय पक्षांबाबतची आपली आवडनिवड बाजूला टाकून कर्नाटकी घडामोडींकडे पाहिले पाहिजे. राजकीय पक्ष हे सत्तेसाठीच राजकारण करतात. केजरीवाल राजकारणात येतात तेही सत्तेसाठीच. कारण लोक, पक्ष वा स्वत:चे हित साधण्याचा सत्ता हाच खात्रीचा मार्ग असतो. सत्ता ही मानवातील मूलभूत प्रेरणा आहे. सत्तेनेच बदल घडवता येतो. महात्मा गांधीही सत्तेचाच वापर करीत व आश्चर्य वाटावी अशी तडजोड कित्येकदा करीत. अर्थात सध्या कुणाकडेही नसलेली नैतिक सत्ता त्यांच्याकडे होती. तरीही सत्ता ही किळसवाणी बाब आहे ही समजूत टाकली पाहिजे. सत्तेचेही काही गुण असतात हे मान्य करून घडामोडींकडे पाहिले पाहिजे.

तेव्हा भाजपने सत्ता मिळवण्यासाठी धडपड केली हे गैर नाही. सत्तेसाठीच पक्ष निवडणुकीत उतरला व सर्वात जास्त जागा मिळाल्यामुळे भाजपने सत्तेसाठी धडपड केली. भाजपच्या आधी अशी धडपड काँग्रेसने केली हेही लक्षात घ्यावे. विधानसभेच्या २२२ जागांपैकी १४१ जागांवर काँग्रेसला विरोध करणारे आमदार जनतेने निवडून दिले होते. तरी पूर्ण निकाल लागण्यापूर्वीच काँग्रेसने सेक्युलर जनता दलाला बिनशर्त पाठिंबा देऊन स्वत:ला उपमुख्यमंत्रिपद मिळवले.

भाजपचा सत्तेचा सोस, पराभूत होऊनही सत्तेत राहण्याचा काँग्रेसचा आटापिटा तसेच अवघे ३७ आमदार गाठीशी असूनही कर्नाटकची सत्ता कुमारस्वामी यांनी घेणे यात डावे-उजवे करण्याजोगे काय आहे? सत्ता मिळवण्याचा आटापिटा सर्वजण करीत होते. पण आपल्याला पसंत नसणाऱ्या पक्षांचा आटापिटा आपल्याला अनैतिक वाटतो तर पसंत असणाऱ्यांचा योग्य वाटतो. नैतिकतेची कक्षा फक्त राजकीय पक्षांपुरती ठेवता येत नाही. जनतेचाही त्यामध्ये सहभाग केला पाहिजे. कर्नाटकी जनतेने काँग्रेस व सेक्युलर जनता दलाला निश्चित नाकारले आणि भाजपला सत्तेच्या काठावर आणून ठेवले, पण पूर्ण सत्ता दिली नाही. उच्च लोकशाही मूल्य पाळायचे तर एकाच पक्षाला पूर्ण बहुमत मिळेपर्यंत पुन्हा निवडणूक घेणे योग्य होते. उच्च मूल्यांसमोर निवडणुकीसाठी लागणाऱ्या पैशाचा प्रश्न गौण आहे. शिवाय वारंवार निवडणूक झाली की जनता आपोआप एक पक्ष किंवा आघाडीला बहुमत देते असा अनुभव आहे. निवडणूक नको असेल तर सरकार स्थापनेसाठी तडजोड हाच एक मार्ग उरतो. तडजोडीचा हाच मार्ग भाजपसह सर्व पक्षांनी स्वीकारला. हा मार्ग राज्यघटनेला अनुसरून नसेल तर त्याचा शाब्दिक नव्हे तर आंदोलन करून निषेध करायला हवा. तो तसा असेल तर लोकशाहीला काय फायदा झाला हे तपासावे.

कर्नाटकमधील घडामोडींचा विशेष असा की तेथे राज्यघटनेला मोडता घातला गेला नाही. १९५९मध्ये नेहरूंनी, १९६७ व ८४मध्ये इंदिरा गांधींनी, १९८९मध्ये राजीव गांधी व २००५मध्ये बिहार-झारखंडमध्ये मनमोहनसिंग यांनी तर आणीबाणीनंतर जनता पक्षाने राज्यघटना गुंडाळून ठेवून विरोधी पक्षांची सरकारे बरखास्त केली व स्वत:ची सत्ता स्थापन केली. याउलट भाजपने गोवा, मणिपूरमध्ये सत्ता मिळवली, ती राज्यघटनेनुसार. उत्तराखंडमध्ये भाजपने काँग्रेसप्रमाणे आततायीपणा केला. त्याला न्यायालयाने चाप लावला. कर्नाटकमध्ये मात्र काँग्रेस व भाजप दोघांनीही राज्यघटनेच्या मर्यादेत राहून सत्तास्थापनेसाठी प्रयत्न केले हे लोकशाहीसाठी महत्त्वाचे आहे.

कर्नाटकाचे राज्यपाल वजुभाई वाला हे भाजपचे असल्यामुळे, त्यातही मोदींसाठी स्वत:ची आमदारकी सोडण्याचे विशेष काम त्यांनी पूर्वी केले असल्यामुळे त्यांच्याबद्दल संशयाचे धुके वाढवून ठेवणे सोपे झाले. पण वजुभाई वाला यांचा कोणताही निर्णय राज्यघटनेच्या चौकटीबाहेरचा नाही. सोली सोराबजी, कश्यप यांच्यासह अनेक घटनातज्ज्ञांनी याचा निर्वाळा दिला आहे. बोम्मई प्रकरणातील निकाल, सरकारिया आयोग, त्यानंतरचा पंछी आयोग याचा अभ्यास, (जर कोणी केला तर) येदियुरप्पांना आधी संधी देण्यात वजुभाई वाला यांनी राज्यघटनेच्या विरोधी काही केले नाही असे दिसून येईल. सेक्युलर जनता दल हे प्रत्यक्षात 'संघीय' जनता दल आहे अशी टीका करणारा काँग्रेस पक्ष कोणतीही चर्चा न करता एकदम जनता दलाला बिनशर्त पाठिंबा देऊन उपमुख्यमंत्रिपद कसे मिळवतो याबद्दल वजुभाई वाला यांना शंका आली असेल तर त्यामध्ये गैर काय? शंका घेणे हाही विवेकशक्तीचा एक पैलू असतो व राज्यपालांनी विवेकशक्ती वापरावी असे राज्यघटनेने म्हटले आहे.

राज्यपालांनी दिलेली पंधरा दिवसांची मुदत हीसुद्धा सरकारिया आयोगाच्या ३० दिवसांच्या शिफारशीमध्ये बसते हे या ठिकाणी लक्षात घ्यावे. वजुभाई वाला व येडुरिप्पा यांची चूक झाली ती येदियुरप्पांना रातोरात पत्र देण्यात व सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू होण्यापूर्वीच त्यांना शपथ देण्यात. वजुभाई वाला यांनी आजपर्यंतचे राज्यपाल व राष्ट्रपती कसे वागले याचा अभ्यास केला असता तर त्यांनी घाई केली नसती. (अर्थात अभ्यासाशी संघ परिवाराचे नाते नसल्याने अशी चूक होणे साहजिक आहे.) अभ्यासाने वजुभाई वाला यांच्या लक्षात आले असते की सत्तास्थापनेसाठी दिवसांचे बंधन नाही. राष्ट्रपती नारायणन यांनी दोन महिने घेतले होते. राजकीय तडजोड करण्यासाठीच हा वेळ दिला जातो. वाजपेयींना सत्ता स्थापनेसाठी १३ दिवसांची मुदत मिळाली. त्या १३ दिवसांत प्रमोद महाजन, अडवाणी, जसवंतसिंह साधुसंतासारखे बसले नव्हते.

# वाहनतळासाठी वृक्षांना आग?




**नवी मुंबई-** वाशी येथील घाऊक बाजारात वाहनांच्या पार्किंगचा प्रश्न बिकट होत चालला असतानाच बाजारालगतच असलेल्या उच्चदाब वीजवाहिन्यांखालील वृक्ष गेल्या दोन दिवसांत जाळून टाकण्यात आले आहेत. एपीएमसीतील वाहनांच्या पार्किंगसाठी जागा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशानेच ही झाडे जाळण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. एपीएमसीलगतच्या मोकळ्या भूखंडावर हरितपट्टा विकसित करण्यात आला आहे. तिथे शेकडो झाडे लावण्यात आली होती. ती गेल्या दोन दिवसांत आग लावून जाळण्यात आली आहेत. जेसीबी लावून सपाटीकरण केले जात आहे. व्यापाऱ्यांनी वाहने लावण्यासाठी हा प्रकार केल्याचे बोलले जात आहे. तिथे उगवलेली सगळी हिरवळ भस्मसात झाली आहे. विशेष म्हणजे पालिकेच्या उद्यान अधिकाऱ्यांना याबाबत कोणतीच माहिती नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. तुर्भे एपीएमसी परिसरातील भाजी बाजाराच्या मागील बाजूला सिडकोच्या मालकीचा भूखंड आहे. तिथे उच्चदाब वीजवाहिन्या असल्याने नियमानुसार या भूखंडावर झाडे लावून उद्यान निर्माण करण्यात आले होते. एपीएमसी आणि एचपीसीएल यांच्या पुढाकाराने मोठ्या प्रमाणात झाडे लावल्याने हा परिसर हिरवळीने बहरला होता.

एपीएमसीतील व्यापाऱ्यांच्या वाहनांसाठी सध्या जागेची प्रचंड कमतरता भासत आहे. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी वृक्षांची कत्तल केली जात आहे. आग लावून झाडे जाळून टाकण्यात आली आहेत. या भूखंडावर शेवगा, गुलमोहोर, नारळ, गुलमोहर, लिंब, चिंच, बदाम, काशीद, पिवळा गुलमोहर, वड, पिंपळ इत्यादी झाडे होती. आता मोजकीच नारळाची झाडे शिल्लक आहेत. जेसीबीद्वारे सपाटीकरणाचे काम सुरूच आहे. त्यामुळे उरलेल्या नारळाच्या झाडांवरही टांगती तलवार असल्याची चर्चा आहे.

# मीठबंदरच्या तोफांचे जतन होणार!

## *ब्रिटिशकाळातील तोफांचा बोटी बांधण्यासाठी वापर*

**ठाणे-** ब्रिटिशकाळात निकामी झालेल्या तोफा वाळूत रुतवून त्यांचा वापर बोटी बांधण्यासाठी केला जात असे. अशाच काही तोफा ठाणे पूर्व विभागातील मीठबंदर परिसरात असून काही वर्षांपूर्वीपर्यंत चेंदणी कोळीवाड्यातील कोळी या तोफांचा बोटी बांधण्यासाठी वापर करीत असत. मात्र, ऐतिहासिक वारसा असलेल्या या तोफांचे जतन करण्याचा निर्णय घेण्यात आला असून मेरिटाइम बोर्ड, पुरातत्त्व खाते



आणि ठाणे महापालिकेने यासाठी परवानगी दिली आहे. पूर्वीच्या ठाणे किल्ल्याच्या अर्थात सध्याच्या ठाणे कारागृहाच्या परिसरात काही निकामी तोफा होत्या. या तोफा ब्रिटिशांनी मीठबंदरावर येणाऱ्या बोटी बांधण्यासाठी मातीत रुतवून ठेवल्या होत्या. त्या वेळी चेंदणी बंदरावरील बोटी बांधण्यासाठी या तोफांचा वापर केला जात असे. कालांतराने येथील जल वाहतूक थांबली. त्यानंतर चेंदणी कोळीवाडा परिसरातील कोळ्यांनी आपल्या बोटी बांधण्यासाठी या तोफांचा वापर केला. मात्र, सुमारे दहा-पंधरा वर्षांपूर्वी खाडीतील माशांची आवक कमी झाल्यानंतर या परिसरातील मासेमारीचा व्यवसायही बंद पडला. तोफा मात्र जमिनीत रुतून ऊन-पाऊस झेलत उभ्या आहेत.

या तोफांचे जतन व्हावे यासाठी चेंदणी कोळीवाडा जमात, दुर्गवीर प्रतिष्ठान, दुर्गसखा चॅरिटेबल ट्रस्ट आणि रत्नागिरी गडकोट संवर्धन समिती या संस्था गेले वर्षभर प्रयत्न करीत होते. त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून या जागेचा ताबा असलेल्या महाराष्ट्र मेरिटाइम बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी तोफा काढण्यासाठी परवानगी दिली आहे. पुरातत्त्व विभागानेही याची दखल घेत मातीत खोलवर रुतलेल्या तोफा काढण्यासाठी उत्खनन करावे, अशी परवानगी देत पुरातत्त्व शास्त्राचे अभ्यासक डॉ.सचिन जोशी यांच्याकडे हे कार्य सोपवले आहे.येत्या २० मे रोजी तोफा उत्खननासाठी काम सुरू करण्यात येणार आहे. साधारणत: तोफा किती आतपर्यंत रुतल्या आहेत याची मोजणी सर्वप्रथम करण्यात येणार असल्याची माहिती डॉ.सचिन जोशी यांनी दिली. या तोफांचे जतन करण्यासाठी परिसरातच एक सिमेंटचा ओटा तयार करण्यात येणार आहे. या ठिकाणी एकूण ११ तोफा असून त्या आता गंजल्या आहेत. त्यांची आणखी हानी होऊ नये म्हणून तातडीने त्या काढाव्या लागतील.

# मीरा-भाईंदरसाठी स्वतंत्र पोलीस आयुक्तालय

**भाईंदर- मीरा-भाईंदर शहरासाठी स्वतंत्र पोलीस आयुक्तालय स्थापन करण्याच्या दिशेने आणखी एक पाऊल पुढे पडले आहे. पोलीस आयुक्तालयाच्या कार्यालय उभारणीसाठी मीरा-भाईंदर महापालिकेने शासनाकडे पाठवलेला आरक्षण बदलाच्या प्रस्तावाला शासनाने मंजुरी दिली आहे. मीरा-भाईंदर शहरासाठी स्वतंत्र पोलीस आयुक्तालय स्थापन करण्याच्या हालचाली शासनस्तरावर बऱ्याच दिवसांपासून सुरू आहेत. मुख्यमंत्र्यांनी नुकतीच त्याला मान्यताही दिली आहे, परंतु आयुक्तालय स्थापन झाल्यानंतर त्यासाठी स्वतंत्र कार्यालय बांधण्यासाठी पोलीस खात्याला मीरा-भाईंदरमध्ये स्वतंत्र जागेची आवश्यकता होती.**

ही जागा उपलब्ध करून देण्यासाठी मीरा-भाईंदर महानगरपालिकेने आपल्या विकास आराखड्यातील काही आरक्षणांमध्ये बदल करून त्या जागी पोलीस आयुक्तालयाचे आरक्षण समाविष्ट करण्याचा प्रस्ताव मंजूर करून तो शासनाकडे पाठवला होता. या प्रस्तावावर शासनाने आपल्या नगररचना संचालकांचा अभिप्राय मागवला होता. हा अभिप्राय सकारात्मक आल्यानंतर शासनाने महापालिकेच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. त्यामुळे मीरा-भाईंदरसाठी स्वतंत्र पोलीस आयुक्तालय होण्यासाठीचा मार्ग मोकळा झाला आहे. मीरा-भाईंदर हे सध्या ठाणे ग्रामीण पोलिसांच्या आधिपत्याखाली आहे. शहरासाठी दोन स्वतंत्र पोलीस उपअधीक्षक नेमण्यात आले आहेत, परंतु मीरा-भाईंदर शहर हे मुंबईलगत असल्याने येथील गुन्हेगारीची पद्धत शहरातील गुन्हेगारीसारखीच आहे. त्या तुलनेत इथल्या पोलिसांकडे अत्याधुनिक





शस्त्रे, वाहने तसेच इतर साधनसामुग्री उपलब्ध नाही, तसेच पोलीस संख्याबळही फारच अपुरे आहे.या पार्श्वभूमीवर या ठिकाणी स्वतंत्र पोलीस आयुक्तालय करण्याची मागणी करण्यात येत होती. दोन वर्षांपूर्वी शासनाने या मागणीला हिरवा कंदील दाखवल्यानंतर मीरा-भाईंदर महापालिकेने आयुक्तालयाच्या जागेसाठी भूखंड उपलब्ध करून द्यावा, असे आदेश महापालिकेला दिले होते. त्यानंतर महापालिकेचे अधिकारी आणि तत्कालीन पोलीस अधीक्षक राजेश प्रधान यांनी मीरा-भाईंदरसाठी काही जागांची पाहणी केली होती. त्यानंतर मीरा रोड येथील एमआयडीसीकडे जाणाऱ्या रस्त्यावरील आरक्षण क्रमांक ३३४ हा माध्यमिक शाळा आणि खेळाचे मैदान यासाठी राखीव असलेल्या भूखंडास मान्यता देण्यात आली. त्यानंतर या भूखंडावरील शाळा आणि मैदानाचे आरक्षण बदलून ते पोलीस आयुक्तालय करण्यात यावे, असा प्रस्ताव महासभेने मंजूर केला आणि तो शासनाकडे पाठवण्यात आला. शासनाने या आरक्षण बदलास मान्यता दिली असून त्याबाबतचे आदेश नुकतेच मीरा-भाईंदरसाठी महापालिकेला प्राप्त झाले आहेत. हे आरक्षण खासगी भूखंडावर असल्याने पोलीस विभागाकडून त्याचे लवकरच भूसंपादन होण्याची शक्यता आहे. या कार्यवाहीनंतर पोलीस आयुक्तालय स्थापनेच्या कामाला गती मिळण्याची शक्यता आहे.

# सरकत्या जिन्यांची देखभाल कागदावरच

## ठाण्यातील दुर्घटनेनंतर प्रवाशांमध्ये घबराट; अन्य स्थानकांतील सरकते जिने बेभरवशी

**ठाणे -** रेल्वे स्थानकातील प्रवाशांची पायपीट कमी करण्यासाठी बसवण्यात आलेले सरकते जिने प्रवाशांसाठी तापदायक ठरू लागले आहेत. गेल्या आठवड्यात ठाणे स्थानकातील सरकत्या जिन्यावर झालेल्या अपघातानंतर या जिन्यांवरून चढ-उतार करण्यास प्रवासी अनुत्सुक असल्याचे दिसून येत आहे. मध्य रेल्वेने २०१३पासून विविध स्थानकांमध्ये सरकते जिने बसवण्यास सुरुवात केली असली तरी, या जिन्यांच्या देखभाल-दुरुस्तीकडे लक्ष दिले जात नसल्याचेही स्पष्ट होत आहे.

मध्य रेल्वेतील गर्दीच्या स्थानकांमधील ठाणे, कल्याण, डोंबिवली या स्थानकांमधील सरकते जिने वारंवार बंद पडत असल्याच्या तक्रारी प्रवाशांकडून वारंवार केल्या जात आहेत. ठाणे स्थानकाच्या फलाट क्रमांक दोनवरील नव्याने बसवण्यात आलेल्या सरकत्या जिन्यात काही काळातच तांत्रिक बिघाड झाल्याने ते वारंवार बंद होऊ लागल्याचे चित्र स्थानक परिसरात पाहायला मिळत होते. टिटवाळा, डोंबिवली या स्थानकांतील सरकत्या जिन्यांबाबतही अशाच तक्रारी आहेत. त्यातच ठाणे स्थानकातील सरकत्या जिन्यात झालेल्या बिघाडानंतर या जिन्यांचा वापर करणे प्रवासी टाळू लागले आहेत. या जिन्यांची देखभाल व दुरुस्ती नियमितपणे होत नसल्याने बिघाडाच्या घटना घडत असल्याचे प्रवाशांचे म्हणणे आहे. ठाणे स्थानकात फलाट क्रमांक एकवरील सरकत्या जिन्यावर अपघात घडला तेथे दुरुस्तीचे काम अजूनही सुरू आहे. त्यामुळे येथून प्रवाशांना



येजा करण्यास मनाई करण्यात आल्याने उपलब्ध पादचारी पायऱ्यांवर प्रवाशांचा भार आणखी वाढल्याचे चित्र आहे. दरम्यान, सरकते जिने बसवण्यासाठी वेगाने हालचाली करणाऱ्या रेल्वे प्रशासनाने ते कार्यान्वित आहेत की नाही, हे तपासण्याचीही तसदी घेतलेली नाही. ठाकुर्ली स्थानकात बसवण्यात आलेल्या सरकत्या जिन्यांना अनेकदा चक्क कुलूप लावल्याचे दिसून येते.

# भारतात भरपूर गुंतवणूक करा, चीनचे आवाहन

**बीजिंग- सुवर्ण भरारी घेण्याच्या तयारीत असलेल्या भारतीय अर्थव्यवस्थेत भरपूर गुंतवणूक करा, असे आवाहन चीनी नागरिकांना चीनच्या सरकारी मालकीची बँक द इंडस्ट्रियल अँड कमर्शियल बँक ऑफ चायनाने केले आहे. हे आवाहन करताना बँकेने चीनचा पहिला फक्त भारतासाठी सार्वजनिक गुंतवणुकीचा निधी (फंड) सुरू केला आहे.**

अवघ्या दोन आठवड्यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी व चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांची वुहान येथे अनौपचारिक भेट झाली होती. भेटीत उभय नेत्यांनी आपापल्या आर्थिक क्षमतांना नव्या दिशा देण्यासाठी द्विपक्षीय संबंधांचा



वापर करण्याचा प्रयत्न केला होता. त्यानंतर भारतात गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यासाठी वरील लक्षणीय पुढाकार घेतला गेला, असे निरीक्षकांचे मत आहे.

या गुंतवणूक निधीचे नाव इंडस्ट्रियल अँड कमर्शियल बँक क्रेडिट सुस्सी इंडिया मार्केट फंड असे आहे. युरोप व अमेरिकेत नोंदणीकृत व भारतीय बाजारपेठेवर आधारित असलेल्या २० पेक्षा जास्त एक्स्चेंजेसमध्ये बँक गुंतवणूक करील.

भारतात गुंतवणुकीसाठी चीनचा हा पहिलाच जाहीर झालेला फंड आहे, असे ग्लोबल टाइम्स दैनिकाने म्हटले. ही गुंतवणूक प्राधान्याने आर्थिक उद्योगात, त्यानंतर माहिती तंत्रज्ञान, ऊर्जा, आवश्यक वस्तू, कच्चा माल, औषधी, हेल्थ केअर व इतर उद्योगांत केली जाईल.

# हुंड्यासाठी पतीने पत्नीला जिवंत जाळून तिसऱ्या मजल्यावरून फेकलं

**बरेली** - लग्नानंतर सतत हुंड्याची मागणी करणाऱ्या पतीने पत्नीला जिवंत जाळत इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरून फेकल्याची धक्कादायक घटना उत्तर प्रदेशात घडली आहे. सकाळी उत्तर प्रदेशातील मुरादाबादमध्ये ही घटना घडली. २०११मध्ये पीडित महिलेचा लग्न झालं होतं. दरम्यान, पोलिसांनी या प्रकरणी पीडित महिलेचा पती व सासरच्यांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पुष्पा कांदपाल (वय ३२) असं पीडित महिलेचं नाव असून त्या उत्तराखंडमधील बागेश्वरमधील राहणाऱ्या होत्या. पुष्पा यांचं त्रिभुवन कांदपालशी लग्न झालं. त्रिभुवन उत्तर प्रदेशातील मुरादाबादमधील मीरपूरचा रहिवाशी आहे. शिक्षक असल्याचं त्रिभुवनने लग्नाच्या वेळी पुष्पाच्या घरच्यांना सांगितलं होतं. पण त्यावेळी तो बेरोजगार होता, अशी माहिती पोलीस तपासात समोर आली आहे. 'पुष्पाचा पती तिला लग्नानंतर सतत हुंड्यासाठी त्रास देत असल्याचं पुष्पाचा भाऊ बसंत बल्लाहने सांगितल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

पुष्पाला जिवंत जाळून इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरून फेकल्याची माहिती पुष्पाच्या शेजारच्यांनी पोलिसांना व तिच्या कुटुंबियांना दिली. यानंतर महिलेच्या कुटुंबियांनी माझोला पोलीस स्टेशनमध्ये धाव घेत



आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. पुष्पाच्या कुटुंबियांनी दिलेल्या माहितीनुसार, लग्नानंतर पुष्पाच्या सासरच्या लोकांनी तिला त्रास द्यायला सुरूवात केली. तिच्याकडे पैशांची मागणी करत तिला शिवीगाळ व मारहाण करायचे. पुष्पाला मुलंबाळ नसल्याने तिच्या सासरचे लोक तिला त्यासाठीही दोष द्यायचे. पण पुष्पाने कधीही याची तक्रार कुणाकडे केली नाही. ती कुठल्या परिस्थितीत राहत होती, याची आम्हाला कल्पना होती.

# मंगळावर पाठविणार स्वचलित हेलिकॉप्टर

**वॉशिंग्टन** - अमेरिकेची 'नासा' अंतराळ संशोधन संस्था २०२० मधील मंगळ मोहिमेत अतिप्रगत रोव्हरसोबत (एक प्रकारची गाडी) छोटे हेलिकॉप्टरही मंगळावर पाठविणार आहे. पृथ्वीवरील हवाई वाहनाच्या परग्रहावर वापराची ही पहिलीच वेळ असेल. 'नासा'ने म्हटले की, २०२०च्या मोहिमेत रोव्हरसोबत हेलिकॉप्टर पाठविले जाईल. हेलिकॉप्टर मंगळाच्या पृष्ठभागावर नेऊन ठेवल्यानंतर रोव्हरला सुरक्षित अंतरावर थांबण्याचे निर्देश मिळतील. बॅटऱ्या चार्ज झाल्यावर व चाचण्या घेतल्यानंतर पृथ्वीवरील नियंत्रण कक्षातून स्वचलित हेलिकॉप्टरला उड्डाणाच्या कमांड मिळतील. योजनेनुसार ३० दिवसांच्त हेलिकॉप्टरची पाच उड्डाणे केली जातील.



सुरुवातीस ते सरळ वर जाऊन १० फुटांवर एकाच जागी ३० सेकंद गरगरत राहील. हळूहळू वेळ व अंतर वाढवत ते काही शे मीटर आणि ९० सेकंद केले जाईल. 'नासा'च्या म्हणण्यानुसार मंगळावरील वापरासाठी हेलिकॉप्टर किती उपयुक्त, व्यवहार्य ठरते याच्या चाचपणीसाठी ते पाठवले जात आहे. भविष्यात मंगळाच्या वातावरणाचा अभ्यास करण्यासाठी व जमिनीवरून जेथे पोहोचता येत नाही तेथे पोहोचण्यासाठी त्याचा उपयोग करता येईल. या योजनेच्या व्यवस्थापक मिमी आँग हा म्हणाल्या की, पृथ्वीवर हेलिकॉप्टर ४० हजार फुटांपर्यंत उड्डाण करू शकते. मंगळाच्या वातावरणाची घनता पृथ्वीच्या वातावरणाच्या एक टक्का आहे.

# सर्जरीकरता नव्हते पैसे, हतबल मुलाने कापला आईचा पाय

**अहमदाबाद-** भारतातील आरोग्य व्यवस्था या ना त्या कारणाने समोर आली आहे. आरोग्य व्यवस्था आणि रूग्ण यांच्यातील ताळमेळ अद्याप जुळलेला नाही. काही दिवसांपूर्वी उपचारादरम्यान रूग्णाचा तुटलेला पाय डोक्याखाली देऊन डॉक्टरांनी ऑपरेशन केल्याची घटनासमोर आली होती. तर आता उपाचाराकरता पैसे नसल्यामुळे आईचा पायच कापून टाकल्याचा प्रकार समोर आला आहे.

अहमदाबादच्या पंचमहाल जिल्ह्यातील राजगढ गावातील गुलाब चौहानने आपल्या आईचा पायच कापल्याची घटना घडली आहे. गुलाब याच्या आईला गँगरीन झाला होता. हा आजार शरीरातील कोणत्याही भागात रक्ताचा पुरवठा न होत असल्यामुळे होतो. यामुळे शरीरातील त्या भागातील पेशी मृत पावतात. हे गँगरीन शरीरातील



इतर भागात पसरू नये म्हणून तो भाग काढला जातो. जेणे करून तो आजार शरीरातील इतर भागात पोहचत नाही. असाच आजार गुलाब यांच्या आईला होता. त्यांच्या आईच्या पायाला गँगरीन झालं होतं.

# भारतातील बौद्ध भिक्षूंवर चीनमध्ये बंदी

**पेईचिंग - भारतात दीक्षा घेणाऱ्या तिबेटच्या बौद्ध भिक्षूंच्या प्रवेशावर चीनच्या एका प्रांताने बंदी घातली आहे.**



**हे भिक्षू फुटीरतावादी असून चीनमध्ये फुटीरतावादी विचार पसरवित असल्याने त्यांच्यावर बंदी घालण्यात आल्याचं चीनचं म्हणणं आहे.**

शिचुआन प्रांतातील लिटयांग काऊंटीमध्ये ही बंदी घालण्यात आली आहे. चीनमधील 'ग्लोबल टाइम्स' या वृत्तपत्राने त्याबाबतची माहिती दिली आहे. तिबेटमधून भारतात आलेल्या तरुणांना भारतात बौद्ध भिक्षू बनवले जाते. त्यानंतर त्यांना चुकीच्या पद्धतीने प्रशिक्षित केलं जातं. त्यामुळेच या भिक्षुंना लिटयांग काऊंटीमध्ये प्रवेश बंदी करण्यात आली आहे. दरवर्षी काऊंटीमध्ये देशभक्तीचा क्लास घेतला जातो. त्यात सर्वश्रेष्ठ कामगिरी करणाऱ्यांना पुरस्कार दिला जातो. या वलासमधील प्रत्येक व्यक्तीवर नजर ठेवली जाते. फुटीरतावादी विचारांच्या विद्यार्थ्यांवर खास करून लक्ष ठेवले जाते, असं सूत्रांनी सांगितलं. काही गुरुंना परदेशात १४ व्या दलाई लामांकडून बौद्ध धम्माची दीक्षा मिळालेली आहे. आम्ही दलाई लामांना फुटीरतावादी नेते म्हणून पाहतो. त्यामुळेच त्यांनी दीक्षा दिलेल्या प्रत्येक बौद्ध भिक्षूंवर आमची करडी नजर आहे, असं येथील धार्मिक नेते झू वाईकुआन यांनी सांगितलं.

# पश्चिम बंगालमध्ये वीज कोसळून सात मृत्यूमुखी



**कोलकता** - पश्चिम बंगालच्या विविध जिल्ह्यांमध्ये वीज कोसळण्याच्या घटनेमध्ये सात जण मरण पावले, तर नऊहून अधिक जण जखमी झाले. वीज कोसळण्याच्या घटनेनंतर आज सकाळी मुसळधार पाऊस झाला, असे आपत्कालीन व्यवस्थापन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. या वीज कोसळण्याच्या घटनेमध्ये नादिआ जिल्ह्यात चार जण, उत्तर २४ परगणा जिल्ह्यात दोन जण मरण पावले. वीज कोसळल्यामुळे बांकुरा जिल्ह्यात एका शेतकऱ्याचा मृत्यू झाला.

विजेच्या कडकडाटानंतर मुसळधार पाऊस पडला आणि जोरदार वादळी वारे वाहण्यास सुरवात झाली, असे बांकुरा पोलिस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. नादिआ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील घटना ही छाप्रा पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडल्याची माहिती पोलिसांनी दिली. एप्रिलपासून वीज कोसळण्याच्या घटनेमध्ये २५ हून अधिक जण राज्यात मरण पावले आहेत.

# वाराणसी पूल दुर्घटना – पाचवेळा पत्र पाठवूनही करण्यात आलं दुर्लक्ष

**वाराणसी** - वाराणसीत बांधकाम सुरु असलेल्या पुलाचा काही भाग कोसळून १८ जणांचा मृत्यू झाल्यामुळे प्रशासनावर टीका होत असताना उत्तर प्रदेश पोलिसांनी आपण धोक्याची सूचना देणारी पत्रं पाठवूनही त्याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याने ही दुर्घटना घडल्याचा दावा केला आहे. उत्तर प्रदेश पोलिसांनी नोव्हेंबर महिन्यापासून आपण उत्तर प्रदेश राज्य पूल ब्रिज कॉर्पोरेशनला (युपीएसबीसी) पाच पत्रं पाठवली होती अशी माहिती दिली आहे. तसंच बांधकामादरम्यान वाहतुकीच्या नियमांचं उल्लंघन केल्याप्रकरणी फेब्रुवारी महिन्यात एफआयआरही दाखल करण्यात आला होता.

पोलीस महानिरीक्षक दिपक रतन यांनी दिलेल्या माहितीनुसार, 'आम्ही नोव्हेंबर महिन्यापासून युपीएसबीसीला पाच पत्रं पाठवली असून बांधकादरम्यान वाहतुकीच्या नियमांचं पालन करण्यास सांगितलं होतं. जेव्हा एखाद्या पुलाच्या काही भागाचं बांधकाम सुरु असतं तेव्हा त्यांनी वाहतुकीसाठी आपल्या कर्मचाऱ्यांना नियुक्त करणं अपेक्षित असतं. मदतीसाठी ते पोलिसांना



विनंती करु शकतात. पण आम्हीच त्यांना त्यांच्या त्रुटी दाखवून देत होतो. पण त्यांनी काहीच लक्ष दिलं नाही'.

दरम्यान युपीएसबीसीचे व्यवस्थापकीय संचालक रजन मित्तल यांनी बांधकाम सुरु असताना आपण सतत जिल्हा प्रशासन अधिकारी आणि पोलिसांशी संपर्क साधत होतो असं म्हटलं आहे.'आमच्यावर काम वेळेत पूर्ण करण्याचा दबाव होता, मात्र आम्ही क्वालिटीत कोणतीही तडजोड केली नव्हती आणि ही गोष्ट तपासात समोर येईल. तीन शिफ्टमध्ये काम सुरु होतं. पण वाहतूक कोंडी मुख्य समस्या होती. एका बाजूला रेल्वे स्टेशन आणि दुसरीकडे बस स्टँण्ड असल्याने कामात अडथळा येत होता. जिथपर्यंत वाहतूक व्यवस्थापनाचा प्रश्न आहे ती आमची जबाबदारी नाही. आम्ही त्यासंबंधी प्रशासनाशी आणि पोलिसांशी सतत बोलत होतो', असं रजन मित्तल यांनी सांगितलं आहे.

# दिल्ली होणार लोकसंख्येची राजधानी

**संयुक्त राष्ट्रे-** जगातील एकूण लोकसंख्येपैकी दोन तृतीयांश लोक २०५० सालापर्यंत शहरवासी झालेले असतील. हे दृश्य भारत, चीन, नायजेरिया या देशांत प्रकर्षाने पाहायला मिळेल. जपानमधील टोकियो हे जगातील सर्वाधिक लोकसंख्येचे शहर असून तिथे ३.७ कोटी लोक राहातात. मात्र २०२८ पर्यंत सर्वाधिक लोकसंख्येच्या बाबतीत दिल्ली टोकियोला मागे टाकेल, असे संयुक्त राष्ट्रांनी अहवालात म्हटले आहे. संयुक्त राष्ट्रांच्या आर्थिक व सामाजिक घडामोडीविषयक विभागाच्या लोकसंख्याविषयक गटाने हा अहवाल तयार केला. परंतु नंतर २०५० पर्यंत लोक शहरांकडे मोठ्या प्रमाणावर वळतील. चीन हा जगातील सर्वात मोठ्या लोकसंख्येचा देश आहे. मात्र चीनला भारतही मागे टाकण्याची शक्यता आहे, असेही या अहवालात म्हटले आहे.

लोकसंख्याविषयक गटाचे संचालक जॉन विल्मथ यांनी



सांगितले की, जेव्हा शहरीकरणाचा वेग वाढतो, त्या वेळी त्या ठिकाणच्या लोकांना घरे, पाणी, वीज, सार्वजनिक वाहतूक, शिक्षण, आरोग्य तसेच स्वच्छताविषयक सोयीसुविधा पुरविणे हे एक आव्हानच असते. सध्या जगातील ५५ टक्के लोकसंख्या शहरांमध्ये राहते. मात्र २०५० पर्यंत हे प्रमाण ६८ टक्क्यांपर्यंत जाण्याची शक्यता आहे. या शहरीकरणाकडे सकारात्मक दृष्टीने पाहायला हवे. वाढत्या शहरीकरणामुळे लोकांना आरोग्य व शिक्षणाच्या उत्तम सुविधा उपलब्ध होतील. अनेक देशांत शहरीकरणाचा झपाटा मोठा आहे.२०३० साली असतील ४३ मेगासिटी जगात १९९० साली प्रत्येकी १ कोटी किंवा त्याहून जास्त लोकसंख्या असलेल्या फक्त १० मेगासिटी (महानगर) होत्या. मात्र २०१८ साली जगभरात अशा प्रकारच्या मेगासिटीची संख्या ३३ झाली असून २०३० सालापर्यंत ती ४३ पर्यंत जाईल. या बहुतांश मेगासिटी विकसनशील देशांत असतील.

# फेसबुकने बंद केले ५८ कोटी फेक अकाऊंट्स

**वॉशिंग्टन- फेसबुक या सोशल नेटवर्किंग साईटने २०१८ च्या सुरुवातीच्या तीन महिन्यांमध्ये जवळपास ५८ कोटी ३० लाख फेक अकाऊंट्स बंद केले आहेत. फेसबुकच्या कम्यूनिटी स्टँडर्डचे उल्लंघन केल्याने ही कारवाई करण्यात आल्याचे फेसबुकने म्हटले आहे.**

अमेरिकेतील राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत केंब्रिज ॲनालिटिका या ब्रिटनमधील कंपनीने ८७ दशलक्ष फेसबुक युजर्सची माहिती चोरल्याचे समोर आले होते. या प्रकरणाची चौकशी सुरु आहे. या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर फेसबुकने काही दिवसांपूर्वीच जवळपास २०० ॲप्स हटवले होते. फेसबुकवरील या ॲप्सच्या माध्यमातून व्यक्तीगत माहितीचा गैरवापर केल्याचे समोर आल्याने ही कारवाई करण्यात आली होती. आता फेसबुकने फेक अकाऊंट्स आणि फेक पोस्टसंदर्भातही कठोर पावले उचलली आहेत. २०१८ च्या सुरुवातीच्या तीन महिन्यांमध्ये फेसबुकने तब्बल ५८ कोटी ३०



लाख फेक अकाऊंट्स बंद केले आहेत. याशिवाय प्रक्षोभक विधाने असलेली २० लाख पोस्ट, दहशतवाद पसरवणारे १० लाख पोस्ट आणि हिंसाचाराचे जवळपास ३० लाख व्हिडिओ देखील फेसबुकने हटवले आहेत.

# पोलिसांची ड्युटी आठ तासांपेक्षा अधिक नको

**नैनिताल** - पोलिसांच्या कामाची वेळ आठ तासांपेक्षा जास्त असू नये, असे आदेश उत्तराखंड हायकोर्टाने राज्य सरकारला दिले. अत्यंत जिकिरीचे काम करणाऱ्या पोलिसांना अतिरिक्त वेतन मिळाले पाहिजे, असेही कोर्टाने म्हटले आहे. हरिद्वार जिल्ह्यातील ॲड. अरुणकुमार भदुरिया यांनी केलेल्या जनहित याचिकेवर सुनावणीच्या वेळी खंडपीठाने हे आदेश दिले. खडतर कामाची जबाबदारी असणाऱ्या पोलिसांना ४५ दिवसांचे अतिरिक्त वेतन मिळावे, यासाठी सरकारने पावले उचलावीत. पोलिसांना त्यांच्या कार्यकाळात किमान तीन वेळा तरी बढती मिळायला हवी, त्यांच्यासाठी सरकारने घरेही बांधून द्यायला हवीत. पोलिसांना रजा मंजूर करताना त्यांच्या वरिष्ठांनी उदार दृष्टिकोन बाळगला पाहिजे. एखादा पोलीस कामावर असताना जखमी झाला वा मरण पावल्यास त्याच्या कुटुंबीयांना योग्य ती



भरपाई दिली पाहिजे. पोलिसांची दर तीन महिन्यांनी वैद्यकीय तपासणी करण्यात यावी. त्यासाठी डॉक्टर व मानसोपचारतज्ञांची पोलीस दलात विशेष भरती करण्यात यावी. पोलीस ठाण्याच्या ठिकाणी व्यायामशाळा, तरणतलाव अशा सुविधा असाव्यात, असेही खंडपीठाने आपल्या आदेशात म्हटले आहे.


# इंडोनेशियात ३ चर्चवर आत्मघाती हल्ला; ६ ठार

**जकार्ता** - इंडोनेशियामधील जावा शहराच्या पूर्वेकडील सुरबाया येथील तीन चर्चसमोर आत्मघाती हल्ल्याचे वृत्त आहे. या आत्मघाती हल्ल्यात सहा जण ठार झाले आहेत. तर १३ जण जखमी झाले आहेत. घटनेनंतर तेथे मोठ्या संख्येने पोलीस तैनात करण्यात आले आहेत. या आत्मघाती हल्ल्याची जबाबदारी कोणत्याही दहशतवादी संघटनेनं स्वीकारली नाही.



पोलिसांच्या माहितीनुसार, हे सर्व स्फोट अवघ्या दहा मिनिटांमध्ये घडवून आणले आहेत. पहिला स्फोट सकाळी साडेसात वाजता झाला. सांता मारिया कॅथलिक चर्चवर झालेल्या हल्ल्याची ही माहिती आहे. जावा पूर्वचे पोलीस प्रवक्ता फ्रान्स बरुंग मनगेरा यांनी सांगितलं की, तीन चर्चवर हल्ले झाले आहेत.

विशेष म्हणजे फ्रान्सची राजधानी पॅरिसमध्ये एका व्यक्तीनं अनेकांवर चाकूहल्ला केला. त्यात एका व्यक्तीचा मृत्यू झाला होता. तर अनेक जखमी झाले होते. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, हल्लेखोर पोलिसांच्या कारवाईत मारला गेला आहे. हल्ल्यानंतर काही वेळानं आयएस या दहशतवादी संघटनेनं जबाबदारी स्वीकारली होती.




हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)